# दिनांक २५/०९/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग १ ते ५) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/ पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | फ्रेजरपुरा अम. शहर | १६७८/२१ कलम २७९, ३३७ भादवी | अपघात | - | तक्षशीला चौक अमरावती | दि.२४/९/२१ चे ०९.०० ते ०९.३० वा दरम्यान | दि.२४/९/२१ चे ११.३४ वा. | श्रीराम सुर्यभान तायडे, वय ५५, रा. श्याम नगर तक्षशीला नगर महाविदयालय जवळ अमरावती | MH २७ CT ९४४२ चा चालक | भेट देणार अधिकरी- पोउपनि दत्ता नरवाडे ,पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती<br><br>प्राथमीक तपासी अधिकारी व दाखल अधिकारी - पोउपनि दत्ता नरवाडे पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी नमुद घटना ता वेळी व ठिकाणी भाजीपाला ची गाडी लावत असतांना एक महीला आपली गोल्डन रंगाची अॅक्टीव्हा गाडी क्र. Mh २७ CM १५२५ ने कॉग्रेस नगर कडे जाणाऱ्या रोडने येवुन तक्षशीला महाविदयालयाकडे फ्रेजरपुरा कडे जाण्या करीता वळत असतनां कॉग्रेस नगर कडुन राजकमल कडे जाण्या करिता स्पोर्ट बाईक काळया रंगाची क्र. MH २७ CT ९४४२ चा चालक भरधाव वेगाने व निशकाळजीपणाने गाडी चलवित आला व वरील ऑक्टीव्हा चालक महीलेच्या गाडीला जोरदार धडक मारली व तो स्वताही पडला व त्या महीलेच्या डोक्याला, कमरेला उजव्या पायाला मार लागुन जख्मी झाली व तिला उपचारा करीता तिचे नातेवाइकांनी तिला सुयश हॉस्पीटल येथे भरती केले. अशा फि. चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>गुन्हा जबानी रिपोर्ट वरुन लागलीच दाखल. |
| २. | फ्रेजरपुरा अम. शहर | १६७९/२१ कलम ३७९ भादवी | चोरी | बांधकाम साहीत्य करीता लागणरे पेंट, लोखंडी ग्रील, इलेक्टीक साहीत्य , प्लंबीग साहीत्य , आईल्स , इत्यादी असा एकुण ७२,०००/- चा ाहीत्य | मार्डी रोड वरील डॉ. पचरोले फाउंडेशन , अमरावती | दि.२१/९/२१ चे ००.०० ते २३./९/२१ चे १०.०० वा दरम्यान | दि.२४/९/२१ चे १४.३५ वा. | डॉ. विक्रमसिंग सुरजपालसिंग पचरोले, वय ४२ , व्यवसाय - डॉक्टर , रा.एकविरा नगर पो स्टे राजापेठ , अमरावती | अज्ञात | भेट देणार अधिकरी- पोउपनि दत्ता नरवाडे ,पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती प्राथमीक तपासी अधिकारी व दाखल अधिकारी - पोउपनि दत्ता नरवाडे पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हि दि.२३/९/२१ रोजी पचरोले फाउंडेशन येथील बांधकामावर गेले असता त्यांचे मजुरा कडुन समजले की मार्डी रोडवरील डॉ पचरोले बांधकामवरील खुल्या जागे मध्ये ठैवलेले वरील साहीत्य कोणीतरी अज्ञात इसमाने उघडया जागेवरुन चोरुन नेल्याचे आढळुन आले. त्याचा सर्वत्र शोध घेतला मिळुन आले नाही . असे फि. चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>गुन्हा जबानी रिपोर्ट वरुन लागलीच दाखल |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | बडनेरा | ८१०/२०२१ कलम ३५४(ड), ५०६ भा.दं.वि. | विनयभंग | -- | कंपासपुरा जुनी वस्ती बडनेरा | दि.२४.०९.२०२१ चे २०.१५ वा. | दि. २४.०९.२०२१ चे २१.२५ वा. | एक महिला | दिपक उर्फ पपई लक्ष्मणराव मोरकर वय- ३० वर्ष रा. कंपासपुरा जुनी वस्ती बडनेरा<br><br>आरोपी अटक | दाखल अधिकारी ASI अजय आमले ब.नं.५८४ पोस्टे बडनेरा अमरावती शहर दि.२४.०९.२०२१ चे २०.२० वा. ते २१.०० वा. पर्यंत तपासी अधिकारी - मसपोनि शुभांगी गुल्हाने मँडम पोस्टे बडनेरा अमरावती शहर मो.क्र.९६०४७७२८६३ | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी ही किराणा दुकानात किराणा आणणे करिता जात असते तिला पाहुन आरोपी हा फि.च्या मागे मागे जात असतो घटना ता.वेळी फिर्यादी दुकानात कापुर आणण्या करिता गेली असता आरोपी हा सुध्दा फि.ला पाहुन तिच्या मागे मागे अँक्टिवा गाडीने गेला फि. ही कापुर घेवुन घरी परत येत असता आरोपी ने त्याची गाडी फि.च्या जवळ घेवुन गेला असता फि.ने त्यास विचारले तु नेहमी माझा पाठलाग का करतो तुझी तक्रार पोलीस स्टेशन ला करिन असे म्हटले असता आरोपीने तु माझ्या गाडीवर बस असे म्हणुन तुला घरी सोडुन देतो. वरुन फि.ही ओरडली असता आरोपीने तुला जे वाटते ते कर तु माझी काहीही बिघडु शकत नाही तुला मी पाहुन घेईन अशी धमकी दिली तेथे फि.चे मैत्रिणी आल्या असता आरोपी तेथुन पळुन गेला यातील आरोपी हा नेहमी लैंगिक छळ करण्याच्या व विनयभंग करण्याच्या उद्देशाने फि.चे पाठलाग करतो अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>विलंबाचे कारण- लागलीच |
| ४. | नांदगाव पेठ | ४११/२०२१ कलम ३६३ भादवी | पळवुन नेणे | -- | नांदगाव पेठ स्टँन्ड | दि २४/०९/२०२१ चे १३/१० वा | दि २४/०९/२०२१ चे २१/३३ वा | सरनेश सरमात भोसले वय ३० वर्षे धंदा-मजुरी रा.पिपविहीर पारधी बेडा ता. जि अमरावती | एक महिला<br><br>अटक नाही | १)पोलीस उपआयुक्त परीमंडळ-१<br>२)सहाय्यक पोलीस आयुक्त फ्रेजरपुरा विभाग<br>३) व.पो.नी. प्रवीण काळे पोलीस स्टेशन नांदगावपेठ<br>४) ए.एस.आय. रवी देशमूख ब.न. ६२७ मो.क्र. ९९२३०२६२२६<br>दि २४/०९/२०२१ चे १४/०० वा ते १७/०० वा पावेतो | हकीगत अशा प्रकारे आहे कि घटणा ता. वेळी व ठिकाणी आम्ही घरी असतांना ग्राम पिंपळविहीर येथेच राहणारी महिला ही घरी आली व आम्हाला सांगीतले कि तुझ्या पत्नीचे सिजर झाले असल्याने तुझ्या पत्नी ला १०,००० रुपये ची मदत मिळते .त्यामूळे आम्ही दोघेही पती पत्नी व आमचे दिड महीण्याचे मुलासह नांदगावपेठ येथे आलो असता नमूद महिलेने आम्हाला काहीही न सांगता माझा मूलाला आमची फसवणूक करुन पळवुन नेले. अशा फिर्यादी यांचे जबाणी रीपोर्ट वरुन सदरचा दुन्हा दाखल करुन तपासात घेतला . सदरचा मुलगा मिळून आला.<br>विलंबाचे कारण- फि कडुन विलंब<br>दाखल अधीकारी - नापोका अजय लोखंडे ब.न. ११८७ पो .स्टे .नांदगावपेठ मो.क्र.८३२९९१७१८८५<br>तपासी अधीकारी - ए.एस.आय. रवी देशमूख<br>ब.न. ६२७ पो,स्टे,नांदगावपेठ मो.क्र. ९९२३०२६२२६ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | गाडगेगर अमरावती शहर | २६१४/ २१ कलम २७९,३३७ भादवि | अपघात | -----` | अर्जुन नगर बस स्टॉप चौक अमरावती | दि २३-०९-२१ चे १९-३० वा दरम्यान | दि २४-०९-२१ चे ०२-३६ वा` | राजकुमार भाष्करराव गुडधे व. ४५ वर्षे रा जिल्हा परीषद शाळेजवळ शेगाव अमरावती | सुमीत सुधाकरराव नांदुरकर रा शिवणगाव ता तिवसा जि अमरावती आरोपी अटक नाही | मा सपोनि सांळोखे सा व पो स्टाफ पो स्टे गाडगे नगर अमरावती<br><br>दि २४-०९-२१ चे ०२-४५ वा ते ३ृ०३-३५ वा पावेतो | यातील फीर्यादी यांनी दिलेल्या जबानी जबाणी रिपोर्ट नुसार हकीकत अशी की नमुद घटना तारीख, वेळी व ठीकाणी यातील फीर्यादी यांचे काका असे दोघेजन अर्जुन नगर येथुन पायदळ जावुन अर्जुन नगर वसस्टॉप जवळ आले भरधाव वेगाने एक इसम आला व फीर्यादी चे काका ऑटोची वाट बघत असतांना चौक ओलांडत असता नागपुर कडुन एक मोटार सायकल स्वार आला व फिर्यादीचे काकास ठोस मारली. त्यामध्ये फिर्यादीचे काकाचे पायाला व पोटरीवर, नाकाला , तोंडाला , उजव्या खांद्याला मार लागला त्यानंतर फीर्यादी हे काकांना उचलुन इर्विन दवाखाना अम येथे इलाजाकरीता घेवुन तेथे भर्ती केले फीर्यादी यांचे काकांना धडक देणारा चालक सुद्धा खाली पडला परंतु त्याला मार लागला नाही तेव्हा त्याचे गाडी क्र पाहीले असता सदर गाडीचा क्र एम एच २७ बी के ४१५६ ड्रीम युगा असा असुन त्या चालकाचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव गाव सुमीत सुधाकरराव नांदुरकर असे सांगीतले त्याला फीर्यादी यांनी पो स्टे ला आनले. अशा सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला<br>लागलीच दाखल<br>दाखल अधिकारी- सपोनि सांळोके सा पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर<br>तपासी अधिकारी - पोहेका नैताम ब.न. १०५८ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर |
| ६. | गाडगेगर अमरावती शहर | २६१५/ २१ कलम ३८०,४५४, ४५७ भादवि | चोरी करणे | १२६८८/- रु चा माल विद्युत विभाग शासकीय तंत्रनिकेतन चे खीडकीची ग्रील कापुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेला | शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय अमरावती | दि १७/०९/२०२१ ते २०-०९-२१ चे सकाळी १०-३० वा. | दि २४/०९/२०२१ चे १२-४१ वा` | एक महिला | अज्ञात इसम<br><br>आरोपी अटक नाही | मा सपोनि सांळोखे सा व पो स्टाफ पो स्टे गाडगे नगर अमरावती<br><br>दि २४-०९-२१ चे १२-५० वा ते १३-३० वा चे दरम्यान | यातील नमुद घ ता वेळी व ठीकाणी यातील फीर्यादी हे शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय मध्ये विद्युत विभाग प्रमुख म्हणुन कार्यरत आहे दि १७-०३-२१ ते सांयकाळी ०५-०० वा ते २०-०९-२१ चे सकाळी १०-०० वा पर्यत बंद असलेले विद्युत विभागामध्ये १) व्हेरीक की अं २४३०/- रु २) डिमरइस्टेट ०२ नग की अं ५७४७/- रु ३) डीमरइस्टेट एई मेक टाईप १ आयएसडी १ पी कँपासीटी ४-१ नग की अं ९१३/- रु ४) डीटमरइस्टेट एई मेक टाईप ८ डी १ पी कँपासीटी २.१६ केसीए एस इ न. टी २७९/१५८० -१ नग की अं ५९८/- रु ५) लँमीनेटेड रोटर इलेक्ट्रीकल मशीन ट्युटर चा पार्ट -१ नग की अं ३००/- रु असा एकुण १२६८८/- रु चा माल विद्युत विभाग शासकीय तंत्रनिकेतन चे खीडकीची ग्रील कापुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेला<br>अशाा सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला<br>लागलीच दाखल<br>दाखल अधिकारी- सपोनि सांळोके सा पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर<br>तपासी अधिकारी - पोहेका पांडे ब.न. १०५० पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **७.** | **गाडगेगर अमरावती शहर** | **२६१६/ २१ कलम ३७९ भादवि** | **चोरी करणे** | **फिर्यादीचे ४१५०० रुपये** | **शेगाव नाका कठोरा नाका अमरावती** | **दि. २४/०९/२०२१ चे १२.०० वा** | **दि २४/०९/ २०२१ चे १७.२५ वा** | **हरिभाऊ लक्ष्मणराव ढेंगळे रा, महेंन्द्र कॉलणी अमरावती** | **अज्ञात महीला<br><br>आरोपी अटक नाही** | **पोउपनि. होळगे पोस्टे. गाडगेनगर अमरावती<br><br>दि २४-०९-२१ चे १७.३० ते १८.०० वा** | **यातील नमुद घ ता वेळी व ठीकाणी यातील फीर्यादी हे सेवानिवृत्त शिक्षक आहे त्याचा पगार झाल्याने ते जिल्हा परिषद शिक्षक सहाकारी बँक रेल्वे स्टेशन जवळ अमरावती येथुन रुपये घेवुन ते कठोरा नाका येथील अमरावती मध्यवर्थी सहकारी बँक येथे पगाराचे ४१५०० रु. बँगमध्ये घेवुन एका अँटोमध्ये बसलेल्या शेगाव नाका येथुन त्याचा अँटोमध्ये चार ते पाच अनओळखी महिला बसल्या होत्या त्यांनंतर फिर्यादी हे पत्निसह कठोरा नाका येथे उतरले व तेथील मध्यावर्थी बँक येथे पैसे परत भरण्याकरिता गेले असता पैसे बँग मध्ये दिसुन आले नाही कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे ४१५०० रुपये हे त्या चार ते पाच महिलांनी घेतले असावे अशा संशय वरुन सदरचा अनओळखी महिलेविरुध्द सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला<br>लागलीच दाखल<br>दाखल अधिकारी- पोउपनि. होळगे पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर<br>तपासी अधिकारी - पोहेका नैताम` ब.न. १०५८ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर** |
| ८. | राजापेठ | १२०३/२०२१ कलम ३०६, ३४ भादवि | आत्महत्येस प्रवृत्त करणे | .. | वसंतराव नाइक झोपडपट्टी दसरा मैदान अम. | २०/०९/२०२१ ते २४/०९/२०२१ चे १०/०० वा दरम्यान | २४/०९/ २०२१ चे १४.०९ वा. | अमोल ज्ञानेश्वर सावळे वय-३६ वर्ष रा. बहाद्दरपूर ता. भातकूली जि. अम. | १) रवी शिंदे २) एक महिला , ३)मोहन सगणे , ४) एक महिला रा. वसंतराव नाइक झोपडपट्टी दसरा मैदान अम<br><br>आरोपी अटक नाही.. | सपोनी प्रशाली काळे` पोस्टे राजपेठ अम. शहर<br>दि. २४/०९/२०२१ चे १४.१५ ते १४४५ | हकीकत अश्या प्रकारे आहे कि, यातील मयत मूरलीधर ज्ञानेश्वर सावळे वय ३८ वर्ष रा. वसंतराव नाइक झोपडपट्टी दसरा मैदान अम.हा फि. चा भाउ असून मयत याने त्याचे शेजारीचे एक घर विकत घेतले होते मागील एक महीन्यापासून मयत हा आरोपीस घर खाली करणे बाबत बोलत होता .,नमूद घ. ता. वेळी व ठीकाणी यातील चारही आरोपीने संगणमत करून वरील कारणावरून भांडण करून त्यास मारहान केली होती ,सदरची बाब ही फि. स मयताकडून सांगण्यात आली होती घर खाली करणे कारणावरून आरोपी हे मयताला शारीरीक व मानसिक त्रास देत होते यालाच कंटाळून त्यांचे त्रासामूळे मयत नामे मूरलीधर सावळे दि.२४/०९/२०२१ चे १०.०० वा दरम्यान राहते घरी आत्महत्या केली ,वरील चारही आरोपी हे त्याचे मरणास कारणीभूत झाले तामूळे मय्यत हा आत्महत्येस प्रवृत्त होउन त्याने आत्महत्या केली अश्या फि. च्या जबानी रि. वरून सदरचा गून्हा दाखल करून तपासात घेतला.<br>दाखल अधी. सपोनि प्रशाली काळे पोस्टे राजापेठ अम. शहर.<br>तपासी अधि. ज्ञ्सपोनि प्राशाली काळे पोस्टे राजापेठ अम शहर मोनं.९८८९३५०१७६ |
| ९. | राजापेठ | १२०४/२१ कलम ३५४ अ, ३४१ २९४,५०६, ३४ भादवी | विनयभंग /अश्लिल शिवीगाळ | .. | प्रिन्स होम अपार्टमेंन्ट प्रगती शाळे समोर गांधी नगर अमरावती | दि.१८/९/२०२१ चे १२/१५ वा दरम्यान | दि.२४/९ /२१ चे २२/४० वा | एक महिला | १.शेखर गौतम २. एक महिला रा. प्रिन्स होम अपार्टमेंन्ट प्रगती शाळे समोर गांधी नगर अमरावती<br><br>आरोपी अटक नाही | सपोनि प्रशाली काळे पोस्टे राजापेठ अमरावती श. दि.२४/९/२१ चे २३/०० वा ते २३/४५ व ा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी यांचे मध्ये पार्कींग बाबत यापुर्वी वाद झाला होता. घ.ता.वेळी व ठीकाणी फि. पार्कींग कडे जात असतांना तिचा रस्ता अडविला व आरोपीने अश्लील भाषेत बोलुन धमकावले व फिर्यादीचा विनय भंग केला. तसेच तेथे आरोपी क्र २ तेथे आली. व फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ केली .अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करु न तपासात घेतला.<br>तापाशी व दाखल अधी--- सपोनि प्रशाली काळे मँ ९६८९३५०१७६<br>विलंबाचे कारणा-- फिर्यादी कड़ुन विलंब |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | खोलापुरी गेट अमरावती शहर | ४३९/२०२१ कलम ३८० भादवि | घरात प्रवेश करुन चोरी | सोन्याचे २६ ग्रॅम वजनच्या मंगळसुत्र कि.अं. ९८००० रुपये | धनराज लेन अंबागेट अमरावती | २४/०९/२०२१ चे ०२/४५ | २४/०९/२०२१ चे १२/१० | एक महिला | अज्ञात | दाखल अधिकारी /भेटदेणारे अधिकारी /तपासी अधिकारी सपोनी इंगळे सा<br><br>विलंबनाचे कारण - लागलीच | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद फिर्यादी हा त्याचे घराचे हॉल मध्ये झोपली असता त्याचे घराच्या दाराची कडी तुटली असल्यामुळे त्याचे दार अर्धवट उघडे होते् त्या दरम्यान यातील नमुद अज्ञात आरोपीने घरात शिरुन फिर्यादीचे गळयात असलेले सोन्याचे ५३ ग्रॅम चे मंगळसुत्रापैकी अर्धवट मंगळसुत्र कशाने तरी कापुन घेवुन घरातुन पळुन गेला तेव्हा फिर्यादीला जाग आली असता फिर्यादीला एक अज्ञात इसम पळतांना दिसला वरुन फिर्यादीने पाठलाग तो पळुन गेला वरुन फिचे जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

## दिनांक २५/०९/२०२१ रोजीचा दैनिक गुन्हे अहवाल (भाग ६) अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला/ मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १. | गाडगेगर अमरावती शहर | २६१७/२०२१ चे कलम २७९ भादवी | हयगयीने व निष्काळजी पणे वाहन चालविणे | ---- | एस.पी. ऑफीस गेट जवळ अमरावती | दि २४/०९/२०२१ चे ११.०० वा | दि २४/०९/२०२१ चे १७.४० वा | एक महिला पोशि. अमरावती ग्रामीण | वाहन क्र. एम एच २७ बि एल ६७०३ चे वाहन चालक<br><br>आरोपी अटक नाही | पोउपनि. होळगे पोस्टे. गाडगेनगर अमरावती<br><br>दि २४-०९-२१ चे १८.०० ते १८.३०वा | यातील नमुद घ ता वेळी व ठीकाणी यातील फीर्यादी यांची गार्ड ईन्चार्ज ड्युटी वर एस पी ऑफीस येथे जात असता आरोपी वाहन चालक क्र. एम एच २७ बी एल ६७०३ चे चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने चालवुन निष्काळजीपणे लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे वाहन क्र,एम एच २७ सिएल ४५६९ ला ठोस मारुन पळुन गेला व फिर्यादीस जखमी केले.अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला<br>लागलीच दाखल<br>दाखल अधिकारी- पोउपनि. होळगे सा पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर<br>तपासी अधिकारी - पोहेका.निळकंठे गवई ब.न. १००५ पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | पो. स्टे. कोतवाली | १०७९/२०२१ कलम १८८ भादंवि सह कलम १३५ म. पो. का. | आदेशाचे उल्लंघन | -- | म.न.पा. आयुक्त कार्यालया समोर , अमरावती | दि. २४/९/२१ चे ११/१५ ते ११.४५ वा. दरम्यान | दि. २४/९/२१ चे १६.०७ वा. | सर तर्फे पो. उप. नि. सुदाम आसोरे रा. पो. स्टे. सिटी कोतवाली अमरावती | राजेन्द्र वामराव भांबोरे सोबत २५ ते ३० महिला आशा वर्कर गट प्रवर्तक संघटना.<br><br>(आरोपी अटक नाही ) | पो. उप. नि. सुदाम आसोरे पो. स्टे. सिटी कोतवाली अम. दि. २४/९/२१ चे १०.०० वा. ते ११.४५ वा. दरम्यान. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी पो. उप. नि. सुदाम आसोरे ,पो. स्टे. सिटी कोतवाली सोबत ASI ९५८,PC १५५५,असे दि. २४/९/२१ रोजी सकाळी १०.०० वा. पासुन मनपा येथे निवेदन बंदो असतांना ११.१५ ते ११.४५ वा. दरम्यान आशा वर्कर बल गट प्रवर्तक संघटना यांच्या वतीने ०९ महिने पुर्वी २२ मार्च २०२१ च्या अमरावती म.न.पा. अंदाज पत्रकामध्ये जाहिर केलेले १,०००/- रू. चू मानधन वाढ थकबाकी सह त्वरित मिळण्यात यावी या मागण्याकरिता म. न.पा. प्रशासनाच्या विरोधात नारेबाजी करून घोषणा देवुन निदर्शने आंदोलन करण्यात आले. सदर निर्दषन आंदोलन करतांना कोणत्याही प्रकारची परवानगी नसतांना विनापरवाना म.न. पा. प्रशासनाच्या विरोधात नारेबाजी देवुन निदर्शन आंदोलन केले वरिल आशा वर्कर गट प्रवर्तक संघटना अमरावती च्या पदाधिकारी व कार्यक्त्यांनी मा. जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय अमरावती यांचे आदेश क्र. कक्ष -२७/कली/गृहविभाग/कावी/२१२/२०२१ दि.. १३/८/२१ संचारबंदी कालावधी मधिल निर्बधाबाबत दि. १५/८/२१ पासुन पुढील आदेशाप्रयेन्त सां. पोलीस उपायुक्त अमरावती यांचा आदेश क्र. पोआअ /विशा /कावसु/२२५८/२०२१ अन्वये दि. १९/९/२१ चे ००.०१ ते दि. ३/१०/२१ चे २४.०० वा. पर्यन्त चे आदेशाचे उल्लघन केल्याने त्यांचे कृत्य कलम १८८ भादंवि सह कलम १३५ म. पो. का. प्रमाणे होत असल्याने त्याचे विरूध्द माझी सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे. अशा फिर्याद वरून व डि. ओ. सा. यांच्या आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.<br>विलंबाची कारण - लागलीच<br>तपाशी अधिकारी - पोउपनि नारमोड रा. पो.स्टे. सिटी कोतवाली अमरावती शहर मो. नं. ९४०३२०५१७५.<br>दाखल अधिकारी - पोउपनि नारमोड रा. पो.स्टे. सिटी कोतवाली अमरावती शहर<br>मो. नं. ९४०३२०५१७५ |
| ३. | पो. स्टे. कोतवाली | १०८०/२०२१ कलम १८८ भादंवि सह कलम १३५ म. पो. का. | आदेशाचे उल्लंघन | -- | बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय दंन्तपँसेल गांधी चौक अमरावती | दि. २४/९/२१ चे १२.०० वा. | दि. २४/९/२१ चे १६.३३ वा. | सर तर्फे पो. उप. नि. सुदाम आसोरे रा. पो. स्टे. सिटी कोतवाली अमरावती मो. नं. ९१३००३५१८७. | रमेश गुलाबराव सोनुले तसेच ३० ते ४० महिला (आरोपी अटक नाही ) | पो. उप. नि. सुदाम आसोरे पो. स्टे. सिटी कोतवाली अम. दि. २४/९/२१ चे १२.०० वा. ते १३.००वा. दरम्यान. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी पो. उप. नि. सुदाम आसोरे ,पो. स्टे. सिटी कोतवाली सोबत HC ८७४,LPC १५८७,असे आंगणवाडी महिला कर्मचारी (सिटु) यांच्या मागण्या संदर्भात शासनाच्या विरोधात निदर्शने आंदोलन करण्यात आले सदर निदर्शने आंदोलन करता वरिल नमुद महिला कर्मचारी तसेच ३० ते ४० महिला उपस्थित होत्या पदाधिकारी व कार्यकत्यांनी कोणत्याही प्रकारची परवानगी नसताना विनापरवाना निदर्शन आंदोलन केले वरिल आंगणवाडी महिला कर्मचारी (सिटु) पदाधिकारी व कार्यकत्यांनी मा. जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय अमरावती यांचे आदेश क्र. कक्ष -२७/कली/गृहविभाग/कावी/२१२/२०२१ दि.. १३/८/२१ संचारबंदी कालावधी मधिल निर्बधाबाबत दि. १५/८/२१ पासुन पुढील आदेशाप्रयेन्त सां. पोलीस उपायुक्त अमरावती यांचा आदेश क्र. पोआअ /विशा /कावसु/२२५८/२०२१ अन्वये दि. १९/९/२१ चे ००.०१ ते दि. ३/१०/२१ चे २४.०० वा. पर्यन्त चे आदेशाचे उल्लघन केल्याने त्यांचे कृत्य कलम १८८ भादंवि सह कलम १३५ म. पो. का. प्रमाणे होत असल्याने त्याचे विरूध्द माझी सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे. अशा फिर्याद वरून व डि. ओ. सा. यांच्या आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.<br>विलंबाची कारण - लागलीच<br>तपाशी अधिकारी - पोउपनि नारमोड रा. पो.स्टे. सिटी कोतवाली अमरावती शहर मो. नं. ९४०३२०५१७५.<br>दाखल अधिकारी - पोउपनि नारमोड रा. पो.स्टे. सिटी कोतवाली अमरावती शहर मो. नं. ९४०३२०५१७५ |

# दिनांक २५/०९/२०२१ रोजी अकस्मात मृत्यू बाबतचा अहवाल. अमरावती शहर

| अ. क्र. | पो.ठाणे | अकस्मात मृत्यू क्रमांक व कलम | वारस/ बेवारस | हॉस्पीटल /ठिकाण | मयताचे नांव | वय वर्ष | स्त्री/ पुरुष | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ०९ | १० |
| १ | बडनेरा | ६४/२०२१ कलम १७४ जा. फौ.<br><br>घटना ता. वेळ २३.०९.२०२१ चे १९.४५ वा.<br><br>दाखल ता. वेळ - दि. २४.०९.२०२१ चे ०९.५६ वा | राजेश गोविंदराव तिरपुडे, वय ४९ वर्षे, रा. अशोक नगर, नवी वस्ती, बडनेरा. | राहते घर, अशोक नगर, नवी वस्ती, बडनेरा.<br><br>. | शरद दादाराव तिरपुडे, वय ३३ वर्षे, रा. अशोक नगर, बडनेरा. | ३३ | पुरूष | पोउपनि. प्रविण पाटील, पो.स्टे. बडनेरा, अम शहर.<br><br>दि. २३.०९.२०२१ चे २०.५० वा. ते २१.३० वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील मयत इसम नामे शरद दादाराव तिरपुडे, वय ३३ वर्षे, रा. अशोक नगर, बडनेरा हा फिर्यादीचा पुतण्या असुन तो सा. बां. वि. नागपुर येथे नोकरी करीत होता. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना माहीती मिळाली की, शरद तिरपुडे याने त्याचे राहते घरी गळफास घेतला आहे. वरून फिर्यादी यांनी जाऊन पाहीले असता शरद तिरपुडे हा पंख्याला वायर बांधुन गळफास घेतलेल्या स्थितीत दिसला. वरून त्यास पोलीसांच्या मदतीने इर्विन दवाखाना, अम. येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले. मयत हा दारू पिण्याच्या सवयीचा होता. त्याचे कोणासोबतही भांडण नव्हते. त्यास कुठलाही आजार नव्हता. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.<br>विलंबाचे कारण - लागलीच<br>तपास अधिकारी - पो.हे.कॉं. विजय केवतकर, ब.न. १७ पो.स्टे. बडनेरा. मो.नं. ९१३०४३५९८३ |
| २ | बडनेरा | ६५/२०२१ कलम १७४ जा. फौ.<br><br>घटना ता. वेळ - २३.०९.२०२१ चे २२.०० वा. ते २३.०० वा. दरम्यान.<br>दाखल ता. वेळ - दि. २४.०९.२०२१ चे १३.०० वा. | प्रफुल महादेवराव अंबाडरे, वय २५ वर्षे, रा. हमालपुरा, नवी वस्ती, बडनेरा. | राहते घर, हमालपुरा, नवी वस्ती, बडनेरा. | शिवा महादेवराव अंबाडरे, वय ३२ वर्षे, रा. हमालपुरा, नवी वस्ती, बडनेरा. | ३२ | पुरूष | पोउपनि. प्रविण पाटील, पो.स्टे. बडनेरा, अम शहर.<br><br>दि. २४.०९.२०२१ चे ०७.३० वा. ते ०८.३० वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील मयत इसम नामे शिवा महादेवराव अंबाडरे हा फिर्यादीचा मोठा भाऊ आहे. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी मयताची पत्नी व आई दवाखान्यातुन घरी आल्या असता त्यांना शिवा अंबाडरे हा नायलॉन दोरीने घरातील पंख्याला गळफास घेतलेल्या स्थितीत दिसला. त्यास लोकांच्या मदतीने इर्विन दवाखाना येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषीत केले. मृतकाने का फाशी घेतली हे फिर्यादीला माहीत नाही. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.<br><br>विलंबाचे कारण - लागलीच<br>तपास अधिकारी - पो.हे.कॉं. राजेंद्र घांगडे, ब.न. ८८२ पो.स्टे. बडनेरा, अम शहर. मो.नं. ९८२३२४८७४० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | राजापेठ | ५८/२१ क.१७४ जाफौ<br><br>घटना ता. वेळ - २४/०९/२०२१ चे ०२/४५वा., दाखल ता. वेळ .दि.२४/०९/२०२१ चे ०७/४७ वा. | एक महिला | कक्कड लेआउट अम. पंत यांचे घरी भाड्याने साइनगर अम. | दिनेश वामन डूकरे वय-५४ वर्ष रा कक्कड लेआउट साइनगर अम. | ५४ | पूरूष | पोउपनि मनोज उसरटे पोस्टे राजापेठ अम. शहरदि.२४/०९/२०२१ चे ०८/३०. | हकीकत अश्या प्रकारे आहे कि, आज दि. २४/०९/२०२१ रोजी फि.यांनी पे. स्टे ला येवून जबानी रि. दिला कि, त्याचे पती नामे दिनेश वामन डूकरे वय-५४ वर्ष यांना एच आय व्ही व टी. बी असा आजार असल्याने उपचार सूरू होते आज दि. २४/०९/२०२१ रोजी रात्री ०२.४५ वा दरम्यान फि. व तिची मूलगी असे बेडरूममध्ये झोपले होते व मृतक हॉल मध्ये झोपले होते तर नमूद फि. यांनी उठून पाहीले सता नमूद मृतक हे त्याना दिसून आले नाही म्हणून फि. यांनी बाहेर जावून पाहिले असता त्याचे पती मृतक हे मागील बाजूस असलेल्या लोखंडी सीडीला नायलॉनचे दोरीला गऴफास घेवून लटकलेले दिसले वरून तिने तीची मूलगी हिला बोलावून व गऴफास घेतलेली दोरी ब्लेडने कापून त्यांना खाली उतरवले त्यांच्या दोन्ही हाताला धारधार वस्तूने कापलेले दिसले , वरून नमूद फि. यांनी घरमालक यांना बोलावून घेतले वर नमूद घरमालक यांनी पोलीसांना माहीती दिली , वरून नमूद मृतक यांनी आजाराला कंटाळून स्वत.चे हाताला काहीतरी धारधार वस्तूने कापून जखमी करून घेतले व गऴफास घवून आत्महत्या केली. अश्या फि. च्या जबानी रि. वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला व सदर मृतकाचे प्रेत मच्यूरी येथे पी एम करीता घेवून सपोउपनि ७५०,नापोका ३८४ असे रवाना झाले.<br>दाखल अधि-पोउपनि मनोज उसरटे पोस्टे राजापेठ अम.<br>तपासी अधी- पोउपनि मनोज उसरटे पोस्टे राजापेठ अम. मोनं.९८२३०५६४५४ |